# मुंबई विद्यापीठ

**परिपत्रक क्र. मशिमाक/ २७ /२०२४–२०२५**

**विषयः– विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील रिक्त असलेल्या प्राचार्य पदावर प्रभारी प्राचार्यांची नेमणुकीबाबत...**

संदर्भः– १) विद्यापीठ परिपत्रक क्र.घ.म./२१/२०१२ दि. २८ मार्च, २०१२
२) शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०१७/प्रक्र.१७०/मशि–५ दि.२३ एप्रिल, २०१८.
३) विद्यापीठ परिपत्रक क्र. सीटीएयु/१९/२०२०–२०२१ दि.०६ मार्च, २०२१
४) शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०१७/प्रक्र.१७०/मशि–५ दि.२३ मार्च, २०२१.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व अशासकीय अनुदानित, कायम विना अनुदानित तसेच स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक व संस्थांचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने वेळोवळी निर्गमित केलेले शासन निर्णय तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदींनुसार प्राचार्य या संवर्गाचे पद कार्यालय प्रमुखाचे पद आहे. तसेच महाविद्यालयातील दैनंदीन प्रशासकीय तसेच शैक्षणिक कामकाजाच्या दृष्टीने तसेच राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती प्रमाणपत्र मिळण्याकरिता नियमित प्राचार्य असणे बंधनकारक आहे.

परंतु, बऱ्याच विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये नियमित प्राचार्यांच्या नेमणुका करण्यात येत नसून अध्यापकांना प्रभारी प्राचार्य म्हणून नेमणूक केली जात आहे व सदर अध्यापकांच्या प्रभारी प्राचार्य नेमणुकीबाबत विद्यापीठाकडून कुठल्याही प्रकारची मान्यता घेण्यात येत नाही असे निदर्शनास आले आहे.

याबाबत विद्यापीठ प्रशासनाने गंभीर दखल घेतली असुन सर्व संलग्नित अनुदानित कायम विनाअनुदानित तसेच स्वायत्त महाविद्यालयांना कळविण्यात येते की, महाविद्यालयात नियमित प्राचार्य अथवा नियमित प्राचार्य नसल्यास प्रभारी प्राचार्यांच्या नेमणुकीचे विद्यापीठाकडून मान्यता घेणे बंधनकारक आहे. सदर प्रभारी प्राचार्यांची मान्यता नसल्यास विद्यार्थींचे नावनोंदणीचे तसेच परिक्षेचे फॉर्म विद्यापीठाकडून स्विकारले जाणार नाहीत व त्याची सर्वश्री जबाबदारी महाविद्यालयांच्या संबंधीत संस्थेची राहील, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

..२/–

या परिपत्रकाद्वारे आपणास विनंती करण्यात येत आहे की, जर आपल्या महाविद्यालयात नियमित प्राचार्य पद रिक्त असल्याने सदर पद भरण्याची प्रक्रिया सुरू असल्यास अशा महाविद्यालयात प्राचार्य पदासाठी अर्हता धारक विद्यापीठ मान्यतापत्र सेवाजेष्ठ अध्यापकास प्रभारी प्राचार्य पदाचा कार्यभार शासन निर्णयातील तरतुदींच्या अधिन राहुन देण्यासाठीची कार्यवाही करावी.

मुंबई — ४०० ०३२.
दिनांक :— १२ नोव्हेंबर, २०२४

( डॉ. प्रसाद कारंडे )
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व अशासकीय अनुदानित, कायम विना अनुदानित तसेच स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक व संस्थांचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१. उपकुलसचिव, नांवनोंदणी विभाग
२. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ
त्यांना कळविण्यात येते की, संलग्नित महाविद्यालय/संस्थेत प्राचार्य/प्रभारी प्राचार्य यांचे विद्यापीठाचे मान्यता पत्र उपलब्ध नसल्यास नांवनोंदणी/परिक्षा फॉर्म स्विकारू नये.